# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 09 January 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०९ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- नागरिकांच्या सोयीसाठी ऑनलाईन सेवांमध्ये वाढ करण्याचे मुख्यमंत्र्यांचे प्रशासनाला निर्देश
- मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भातला शासन आदेश केंद्राकडून जारी
- रस्ते अपघातातल्या जखमींसाठी दीड लाखापर्यंत विनारोकड उपचार योजना सुरु, हिट अँड रनमधल्या मृतांच्या वारसांना २ लाख रुपयांची मदत
- १३ जानेवारीपासून सुरु होणाऱ्या प्रयागराज इथल्या कुंभमेळ्याची तयारी पूर्ण, आकाशवाणीच्या विशेष गीताचं लोकार्पण

आणि

- तिरुपती इथं चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू, तर ४० जण गंभीर जखमी

****

राज्यात ऑनलाईन सेवांमध्ये वाढ करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मुंबईत काल राज्य सेवा हक्क आयोगाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. राज्यातल्या नागरिकांना आवश्यक त्या सेवा सुलभतेने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने `आपले सरकार सेवा पोर्टल`द्वारे सद्यस्थितीत ५३६ ऑनलाईन सेवा दिल्या जात आहेत, त्याचा नागरिकांना व्यापक प्रमाणात उपयोग होत आहे. त्या पार्श्वभूमीवर या ऑनलाईन सेवांमध्ये वाढ करण्यास त्यांनी सांगितलं. अधिक सक्रियतेने आणि सुलभरित्या व्यापक स्वरुपात या पोर्टलद्वारे नागरिकांना जास्तीत जास्त प्रमाणात ऑनलाईन सेवा उपलब्ध होतील, यादृष्टीने नियोजन करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

****

नवी मुंबईत पोलिस विभागाच्या नशामुक्त नवी मुंबई अभियानाला काल मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला. अंमली पदार्थाच्या विरोधात लढणं हीच आजच्या काळातली देशभक्ती असून, या लढाईत सहभागी होण्याचं आवाहन, त्यांनी यावेळी केलं. सध्या अंमली पदार्थांचे व्यवहार सामाजिक संपर्क माध्यमांवरूनही होत असल्याचं दिसून येत आहे, अशा व्यवहारांची माहिती मिळाल्यास, ८८ २८ ११२ ११२ या टोल-फ्री क्रमांकावर सूचित करण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. ते म्हणाले ...

> ***''आज जो आपल्याला टोल फ्री नंबर सांगितलेला आहे, हा टोल फ्री नंबर याकरता आहे, की आपल्यापैकी कोणालाही कुठेही अशा प्रकारची शंका आढळली, तर आपण त्यानंबरवर सांगितलं पाहिजे. आपली आयडेंटीटी कुठेही डिस्क्लोज होणार नाही. हे खरंय की आपण, स्वतः कदाचित ड्रग पेडलरशी लढू शकणार नाही. पण त्या लढाईमध्ये आपण एक सैनिकाचं काम करू शकतो. इन्फॉर्मरचं काम करू शकतो. ती एक अत्यंत मोठी समाजाची सेवा असेल. आजच्या काळामध्ये ड्रग ॲडिक्शनच्या विरूद्ध लढणं ही खऱ्या अर्थानं देशभक्ती आहे.''***

या कार्यक्रमाला वनमंत्री गणेश नाईक, सिने अभिनेता तसंच या उपक्रमाचा दूत जॉन अब्राहम, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

****

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भातला शासन आदेश केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी, राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्याकडे काल सुपूर्द केला. सामंत यांनी नवी दिल्लीत शेखावत यांची भेट घेतली, ज्येष्ठ विचारवंत सदानंद मोरे, आणि राज्य सरकारनं नियुक्त केलेल्या समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मुळे यावेळी उपस्थित होते. या बैठकीनंतर सदर शासननिर्णय शेखावत यांनी सुपूर्द केला.

सामंत यांनी पत्रकारांना याबाबत माहिती देतांना, प्राकृत भाषेतल्या संशोधनासाठी सहाय्याची विनंती केंद्राकडे केली असल्याचं सांगितलं. ते म्हणाले..

***‘‘मराठी भाषेला अभिजात भाषेचा जो दर्जा दिलेला आहे, त्याची अधिसूचना आमच्याकडे म्हणजे महराष्ट्राच्या जनतेकडे सुपूर्द केलेली आहे. मी माननीय नरेंद्र मोदी साहेबांना, आणि सांस्कृतिक मंत्री शेखावत साहेबांना मनापासून धन्यवाद देतो. आमच्या महाराष्ट्राच्या जनतेचं आणि विशेषतः मराठी भाषिकांचं जे स्वप्न होतं, ते आज अधिकृतरित्या परिपूर्ण होतंय. प्राकृत भाषेला जो, अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे, त्या प्राकृतवर महाराष्ट्रामध्ये देखील फार मोठ्या पद्धतीनं संशोधन होतंय. त्यासाठी देखील निधीची उपलब्धता करून द्यावी अशी मागणी आम्ही शेखावत साहेबांकडे केल्यानंतर त्यालादेखील त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिलाय.’’***

****

रस्ते अपघातातल्या जखमींसाठी विनारोकड उपचार देणारी योजना केंद्र सरकारनं कालपासून सुरू केली. याअंतर्गत दीड लाख रुपयांपर्यंतचे उपचारांसाठी कोणतीही रोख रक्कम द्यावी लागणार नाही. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी नवी दिल्लीत काल ही घोषणा केली. याबाबत अधिक माहिती देताना, ते म्हणाले...

***‘‘ॲक्सिडेंट होने के बाद तुरंत चौबीस घंटे के अंदर जैसे ही पुलिस मे इन्फर्मेशन जायेंगी, वो डॉक्टर जो होगा उसको, वो जो पेशंट ॲडमिट होगा, उसको सात दिन तक ट्रीटमेंट का खर्चा या मॅग्झिमम देड लाख रूपये हम तुरंत देंगे उसकी ट्रीटमेंट के लिये। बादमें हीट ॲन्ड रन व्हिक्टीम जो है, उसमें भी मृत्यू होती है, तो हम दो लाख रूपये देंगे।’’***

****

प्रयागराज इथं यंदा १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यात महाकुंभ २०२५चं आयोजन करण्यात आलं आहे. या महाकुंभासाठी केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल एका विशेष गाण्याचं लोकार्पण केलं.

दरम्यान, १३ जानेवारीपासून सुरु होणाऱ्या महाकुंभमेळ्याला ४५ कोटींहून अधिक भाविक भेट देण्याची शक्यता केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांनी व्यक्त केली. त्यांनी काल प्रयागराज इथं कलाग्राम केंद्राचा आढावा घेतला. तर, केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी नवीन टर्मिनल इमारतीची पाहणी

केली. १५ जानेवारीपासून प्रयागराज विमानतळ सुरु होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

आंध्र प्रदेशमध्ये तिरुपती इथल्या बालाजी मंदीरात वैकुंठ गेटवर काल झालेल्या चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू झाला, तर इतर ४० जण गंभीर जखमी झाले. तिरुपतीमधल्या विष्णू निवास आणि रामनायडू शाळेजवळ वैकुंठ एकादशीच्या दर्शनाचे टोकन वाटप करत असताना ही घटना घडली. गंभीर जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी चेंगराचेंगरीत भाविकांच्या मृत्यूबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. त्यांनी जखमींवर करण्यात येत असलेल्या उपचारांबाबत अधिकाऱ्यांशी फोनवरून चर्चा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून, केंद्र शासनाकडून सर्व प्रकारच्या सहकार्याचं आश्वासन दिलं आहे.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सात कलमी कृती कार्यक्रमाची छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रत्येक कार्यालयाने अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं विविध विभागांच्या आढावा बैठकीत बोलत होते. विभागात बीड, परभणी, तसंच धाराशिव इथं जिल्हाधिकाऱ्यांनी काल यासंदर्भात बैठक घेऊन सात कलमी कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

****

तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्र महोत्सवात काल देवीची विशेष रथ अलंकार महापूजा मांडण्यात आली होती. तर देवीची प्रक्षाळ पूजा आणि गरुड या वाहनावरुन छबीना मिरवणूक काढण्यात आली.

****

एचएमपीव्ही या श्वसनविकाराबाबत घाबरण्याचं कारण नाही. याचा सामना करण्यासाठी बीड जिल्हा आरोग्य विभाग तयार असल्याचं, बीडचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी म्हटलं आहे. धाराशिव जिल्ह्यातही याबाबत आवश्यक दक्षता घेण्यात येत असल्याचं, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी

अधिकार डॉ. मैनाक घोष तसंच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एस.एल हरिदास यांनी सांगितलं आहे. लातूर महापालिकेच्या आरोग्य विभागानेही नागरिकांना घाबरून न जाता, या संदर्भातल्या सूचनांचं पालन करण्याचं आवाहन केलं आहे.

****

परभणी इथं वाहतुक सुरक्षा सप्तानिमित्त काल जनजागृती फेरी काढण्यात आली. वाहतुक सुरक्षेबाबत संदेश देणारे फलक हाती घेतलेले विद्यार्थी या फेरीत सहभागी झाले होते.

****

राज्य पोलीस दलाच्या वर्धापन दिनानिमित्त धाराशिव जिल्ह्यात परंडा पोलिस ठाण्याकडून विविध उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या पोलिस ठाण्यांना भेटी, महिला आणि मुलीच्या संरक्षणाविषयी मार्गदर्शन, शस्त्र प्रदर्शन, जनजागृती फेरी, आदी उप्रकमांचा समावेश असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने थकीत मालमत्ता कर भरण्यासाठी संबंधित मालमत्ता धारकांना उद्या १० तारखेपर्यंत व्याज शास्तीमध्ये ७५ टक्के सुट दिली आहे. या संधीचा लाभ घेऊन मालमत्ता धारकांनी थकीत मालमत्ता कराचा भरणा करावा असं आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केलं आहे.

****

नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत काल लातूर इथं विभागीय तसंच जिल्हास्तरीय उल्लास मेळावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी या मेळाव्याचं उद्घाटन केलं. नव भारत साक्षरता कार्यक्रमात शिक्षक आणि विद्यार्थ्यांसह समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेवून १५ वर्षांवरील प्रत्येक निरक्षर व्यक्तीला साक्षर करण्यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन वर्षा ठाकूर यांनी केलं. या निमित्तानं साक्षरता फेरीही काल काढण्यात आली.

****

बीड विभागात नवीन दोन ई बसेस दाखल झाल्या असून, या बस बीड ते पंढरपूर मार्गावर सुरू करण्यात येत आहेत. बीड ते पंढरपूर सकाळी साडे सहा आणि आठ वाजता आणि दुपारी ५ वाजता असेल, तर परतीला पंढरपूर ते बीड ही बस सकाळी

आठ वाजता, दुपारी एक आणि अडीच वाजता सुटेल. चौसाळा, येरमाळा, बार्शी, कुर्डूवाडी मार्गे ही बस धावेल, अशी माहिती सहाय्यक वाहतूक अधीक्षक संतोष नागनाथ महाजन यांनी दिली.

****

नांदेड जिल्हा प्रशासनानं या वर्षातल्या तीन स्थानिक सुट्ट्या जाहीर केल्या आहेत. १७ जानेवारीला हजरत हाजी सैयाह सरवरे मगदूम यांचा ऊर्स, एक सप्टेंबरला ज्येष्ठा गौरी पूजन तर १८ डिसेंबरला श्रीक्षेत्र खंडोबा माळेगाव यात्रेनिमित्त सुटी देण्यात आली आहे.

****

नागरिकांनी विशेषत: मुलांनी रेल्वे रुळांजवळ पतंग उडवू नये, असं आवाहन दक्षिण मध्य रेल्वेने केलं आहे. चिनी बनावटीचा मांजा वीज प्रवाहक असल्याने, हा मांजा रेल्वेच्या वीज वाहिन्यांच्या संपर्कात आल्याने अनेकांना वीजेचा गंभीर धक्का बसल्याच्या घटना घडल्या आहेत, या पार्श्वभूमीवर रेल्वेनं हे आवाहन केलं आहे.

****